माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-७४६५/२०२३/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजय अनंत कुलकर्णी | नायब तहसीलदार,तहसील कार्यालय करमाळा, जि.सोलापूर | तहसीलदार, तहसील कार्यालय करमाळा, जि.सोलापूर |

**( सुनावणी दिनांक - २१/०७/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.११.१२.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१६.०६.२०२३ च्या माहिती अर्जात रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत १ ते ४ मुद्यांची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, “अपिलार्थीला काहीही उत्तर /माहिती दिली नाही.”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला काहीही उत्तर/माहिती दिली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय करमाळा, जि.सोलापूर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ” मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय करमाळा, जि.सोलापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ७४६५/२०२३/ सोलापूर 9536/2025 दिनांक - 13/10/25